Contact : 7559462655/ 88
GENIUS INSTITUTE
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute
Near Gogate Jogalekar College, Ratnagiri.

इ. दहावी | भूगोल

वेळ : 2 तास | पूर्व परीक्षा (सराव पेपर) - 2 (2022-23) | एकूण गुण : 40

## (उत्तरे) पेपर - 2

**प्र 1. अचूक सहसंबध ओळखा व साखळी बनवा :** **4**

उत्तर :1) गंगा नदी - मुखापाशी गाळ जमा होतो - नदयांच्या मुखापाशी अनेक वितरिका आढळतात

2) ॲमेझॉन नदी - मुखापाशी गाळ जमा होत नाही - मुखापाशी बेटे तयार होतात

3) ब्राझील - पाऊ ब्रासील - वृक्षाच्या नावाने देशाचे नाव

4) पानझडी वने - सागवान झाडे - बाष्पी भवनाने पाणी कमी होऊ नये म्हणून वनस्पतीची पाने गळतात

**प्र 2. दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा :** **4**

1) गंगा-ब्रम्हपुत्रा प्रणालीच्या त्रिभुज प्रदेश त्रिभूज प्रदेशाला **सुंदरबन** म्हणतात.

2) अरवली पर्वताच्या पायथ्याशी **माळवा** पठार आहे.

3) ब्राझील या देशात लोकसंख्येची सरासरी घनता 23 व्यक्ती प्रति चौकिमी एवढी आहे.

4) **आसाम** च्या दलदलीच्या प्रदेशात एकशिंगी गेंडा आढळतो.

**प्र 3. खाली दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा : (कोणतेही चार)** **4**

1) ब्राझीलच्या वायव्ये कडून आग्नेयेकडे जाताना आढळणाऱ्या प्राकृतिक रचनेचा क्रम -

**उत्तर :** गियाना उच्चभूमी-ॲमेझॉन खोरे-ब्राझील उच्चभूमी

2) ब्राझीलमधील पर्जन्यछायेचा प्रदेश -

**उत्तर :** उत्तरेकडील उच्चभूमी

3) ब्राझीलमधील कमी नागरीकरण झालेले राज्य -

**उत्तर :** पारा

4) या वनांतील वृक्षांची पाने रुंद व हिरवीगार असतात -

**उत्तर :** सदाहरित वने


5) भारतातील दक्षिण-पूर्व वाहणा-या नदया -

**उत्तर :** कावेरी-कृष्णा-गोदावरी

**प्र 3. (अ) तुम्हाला पुरवलेल्या भारताच्या नकाशा आराखडयात पुढील घटक दाखवा तसेच त्यांची नावे व चिन्हांची सूची तयार करा : (कोणतेही चार)** **4**

(1) पश्चिम बंगाल
(2) कर्कवृत्त
(3) कारिकाल
(4) दिल्ली
(5) इंदिरा पॉइंट
(6) हिमाचल प्रदेश

Genius JEE | NEET | CET | FOUNDATION Institute




**प्र. 3. (आ) पुढील भारताच्या नकाशाचे वाचन करून त्यासंबंधी दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा : (कोणतेही चार)** **4**

1) ब्राझीलमधील सर्वात मोठे नदीचे खोरे कोणते आहे?

**उत्तर :** ब्राझीलमधील सर्वात मोठे नदीचे खोरे ॲमेझॉन नदीचे आहे.

2) पॅराग्वे नदी कोणत्या दिशेने वाहते?

**उत्तर :** पॅराग्वे नदी दक्षिण दिशेने वाहते.

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

3) साओ फ्रान्सिस्को नदी कोणत्या महासागराला मिळते?

**उत्तर :** साओ फ्रान्सिस्को नदी अटलांटिक महासागराला मिळते.

4) मराजो बेट कोणत्या नदीच्या मुखाजवळ आहे?

**उत्तर :** मराजो बेट ॲमेझॉन नदीच्या मुखाजवळ आहे.

5) उत्तरेकडे वाहणा-या कोणत्याही दोन नद्यांची नावे लिहा?

**उत्तर :** जुरुका, झिंगू, अरागुआ, टोकॅन्टीस या उत्तरेकडे वाहणा-या नद्या आहेत.

**प्र 5. पुढील विधानांची भौगोलिक कारणे लिहा : (कोणतेही दोन)** **6**

1) ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यात लोकसंख्येचे वितरण विरळ आहे.

**उत्तर :** i) ब्राझीलमध्ये लोकसंख्येचे वितरण असमान आहे. बहुतांश लोकसंख्या पूर्व किनारपट्टीच्या ३०० किमी रुंदीच्या पट्ट्यात आढळते.

ii) ॲमेझॉन नदीच्या खो-याच्या भागात अत्यंत घनदाट सदाहरित वर्षावने आढळतात जास्त पर्जन्यमान, उष्ण व दमट हवामान आणि घनदाट वर्षावने या प्रतिकूल घटकांमुळे ॲमेझॉन नदीच्या खो-याचा भाग दुर्गम बनला आहे.

iii) ॲमेझॉन नदीच्या खो-यात वाहतुकीचे दाट जाळे विकसित झालेला नाही. त्यामुळे ॲमेझॉन नदीच्या खो-यात लोकसंख्या विरळ आहे.

2) देशाच्या सर्वांगीण विकासासाठी वाहतुकीचा विकास उपयुक्त ठरतो.

**उत्तर :** i) वाहतूक मार्गांचा वापर करून वस्तूंची एका ठिकाणाहून दुस-या ठिकाणी ने आण करता येते. वाहतूक मार्गांचा वापर

करून देशातील लोकांची गतिशीलता वाढते.

ii) वाहतूक मार्गांच्या आधारे देशातील शेती, खाणकाम, मासेमारी, कारखानदारी, पर्यटन, बँका इत्यादी अनेक प्रकारच्या व्यवसायांस चालना मिळते.

iii) वाहतूक मार्गांच्या विकासामुळे देशांतर्गत व्यापारास व आंतरराष्ट्रीय व्यापारास मोठया प्रमाणावर चालना मिळते रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात, देशाचे उत्पन्न वाढते. म्हणून देशाच्या सर्वांगीण विकासासाठी वाहतुकीचा विकास उपयुक्त ठरतो.

3) क्षेत्रभेटीदरम्यान निर्माण होणा-या कच-याचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे.

**उत्तर :** i) क्षेत्रभेटीदरम्यान आपला परिसर स्वच्छ ठेवणे अत्यंत आवश्यक आहे.

ii) वाहनातून प्रवास करताना खिडकीतून बाहेर कचरा फेकू नये. तो कचरा नंतर कचराकुंडीत टाकून त्याची विल्हेवाट लावावी कच याची नंतर.

iii) क्षेत्रभेटीदरम्यान शिस्तीचे पालन करणे आवश्यक आहे. तुमच्या मित्र-मैत्रिणींना सुद्धा शिस्तीचे पालन करण्यास शिक्षित करावे.

iv) कच-याच्या डंपिंकमुळे परिसर कुरूप तर दिसतोच, परंतु तेथील स्थानिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते.

v) त्यामुळे आपण भेट देत असलेली जागा प्रदुषित होऊ देऊ नये. तसेच तेथे कचरा प्रदूषण होऊन परिसराची हानी होणार नाही याची काळजी घेणे आवश्यक आहे.

4) ब्राझीलमध्ये कृमी कीटकांची संख्या जास्त आहे.

**उत्तर :** i) पर्जन्यमान तापमान आणि भौतिक परीस्थिती हे त्या प्रदेशातील वनस्पती आणि प्राण्यांच्या विविधतेमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात.


ii) उच्च तापमान आणि वर्षभर मुबलक पाऊस पडत असल्यामुळे या प्रदेशात सदाहरित वने आढळतात.

iii) परिणामी संपूर्ण वर्षभर हवामान उष्ण व दमट असते जे कीटकांच्या प्रजननासाठी योग्य असते.

iv) उत्तरेकडील उष्णकटिबंधीय पर्जन्यवनांमध्ये आढळणा-या असंख्य प्रजातिव्यतिरिक्त त्या दलदल, गवताळ प्रदेश, पानझडी जंगले इत्यांदींमध्ये देखील आढळतात. त्यामुळे ब्राझीलमध्ये लाखो कीटकांच्या जाती आढळतात.

Genius JEE NEET CET FOUNDATION Institute

**प्र 6. (अ) पुढील सांख्यिकीय माहितीच्या रेषालेख काढा व पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा : 6**



1) कोणत्या वर्षी पर्यटकांची संख्या सर्वाधिक आहे?

**उत्तर : 2015** वर्षी पर्यटकांची संख्या सर्वाधिक आहे?

2) **2000** मध्ये, किती पर्यटकांनी ब्राझीलला भेट दिली?

**उत्तर : 2000** मध्ये, **50** लक्ष पर्यटकांनी ब्राझीलला भेट दिली.

3) कोणत्या वर्षी भारत आणि ब्राझीलमध्ये आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या समान आहे?

**उत्तर : 1995** वर्षी भारत आणि ब्राझीलमध्ये आंतरराष्ट्रीय पर्यटकांची संख्या समान आहे.

**किंवा**

**प्र 6. (आ) दिलेल्या आलेखाचे वाचन करून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा :**

1) प्राथमिक व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी कोणत्या देशात जास्त आहे?

**उत्तर :** प्राथमिक व्यवसायांमध्ये गुंतलेल्या लोकसंख्येची टक्केवारी भारत देशात जास्त आहे.

2) स्थूल अंतर्देशीय उत्पादनात कोणत्या देशात तृतीयक व्यवसायांचे योगदान अधिक आहे?

**उत्तर :** स्थूल अंतर्देशीय उत्पादनात कोणत्या देशात ब्राझील व्यवसायांचे योगदान अधिक आहे.

3) स्थूल अंतर्देशीय उत्पादनात द्वितीयक व्यवसायांचा हिस्सा कोणत्या देशात जास्त आहे?

**उत्तर :** स्थूल अंतर्देशीय उत्पादनात द्वितीयक व्यवसायांचा हिस्सा कोणत्या भारत जास्त आहे.

4) भारताप्रमाणे ब्राझीलची अर्थव्यवस्था शेतीवर आधारित आहे, असे म्हणता येईल का ते सकारण सांगा.

**उत्तर :** ब्राझील ही भारतासारखी कृषीप्रधान अर्थव्यवस्था नाही. जर लोकसंख्येचा मोठा भाग शेतीमध्ये गुंतलेला असेल तर देशाची कृषी अर्थव्यवस्था असते.

5) ब्राझीलमधील द्वितीय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांची टक्केवारी किती आहे?

**उत्तर :** ब्राझीलमधील द्वितीय क्षेत्रात गुंतलेल्या लोकांची टक्केवारी 19% आहे.

6) कोणत्या देशात फक्त 10% लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात गुंतलेली आहे?

Genius JEE | NEET | CET | FOUNDATION Institute

**उत्तर :** ब्राझील देशात फक्त 10% लोकसंख्या प्राथमिक क्षेत्रात गुंतलेली आहे.

**प्र 7. पुढील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा : (कोणतेही दोन)** **8**

1) मानवी वस्त्यांची वाढ विशिष्ट स्थानीच झालेली का आढळते?

**उत्तर :** i) ज्या प्रदेशात मानवी जीवनास प्रतिकूल वातावरण असते उदा. नापीक जमीन, अपुरा पाऊस, प्रदुषित हवा, वाळवंटी प्रदेश, अवर्षणग्रस्त प्रदेश अशा ठिकाणी मानवी वस्ती विरळ असते.

ii) अशा प्रदेशात उदयोगधंदे आणि शेती यांचा विकास होत नाही. त्यामुळे मानवी वस्तीत वाढ होत नाही.

iii) याउलट सुपीक जमीन, पुरेसा पाऊस, स्वच्छ हवा व सूर्यप्रकाश, पाण्याची उपलब्धता इत्यादी घटक मानवी वस्तीस अनुकूल ठरतात.

iv) मानवी वस्तीस अनुकूल असणा-या आणि सोईयुक्त ठिकाणी उदयोगधंदे आणि शेती यांची भरभराट होते. त्यामुळे असे प्रदेश मानवी वस्तीस उपयुक्त ठरतात. म्हणून मानवी वस्त्यांची वाढ विशिष्ट स्थानीच झालेली आढळते.

2) ब्राझीलच्या हवामानावर परिणाम करणारे घटक लिहा.

**उत्तर :** i) ब्राझीलच्या हवामानावर विषुववृत्तीय सान्निध्य, ब्राझीलची उच्चभूमी, अजस्र कडा इत्यादी घटक परिणाम करतात.

ii) तापमानाच्या संदर्भा त ब्राझीलचा उत्तरेकडील प्रदेश उष्ण आहे, तर दक्षिणेकडील प्रदेशाचे तापमान तुलनेने कमी आहे.

iii) ॲमेझॉनच्या खोऱ्या त सरासरी तापमान २५$^{0}$–२८$^{0}$ से. असते, तर उच्चभूमीच्या प्रदेशात हवामान थंड असते.

iv) ॲमेझॉनच्या खोऱ्यात सुमारे २००० मिमी पाऊस पडतो, तर आग्नेय किनारपट्टीवर १००० ते १२०० मिमीपर्यंत पाऊस पडतो.

v) ब्राझील उच्चभूमीचा काही भाग उत्तरेकडील किनाऱ्यापर्यंत आहे. समुद्रावरून येणाऱ्या वाऱ्यांना अजस्त्र कड्यापासून अडथळा निर्माण होतो त्यामुळे किनारी भागात प्रतिरोध प्रकारचा पाऊस पडतो.

vi) उच्चभूमीच्या पलीकडे या वाऱ्यांचा प्रभाव कमी होतो. त्यामुळे येथे अत्यल्प पाऊस पडतो. ब्राझीलमधील हा पर्जन्य–छायेचा प्रदेश आहे. हा प्रदेश ईशान्य दिशेस आढळतो. या शुष्क प्रदेशास 'अवर्षण चतुष्कोण' असेही संबोधतात.

3) आधुनिक संदेशवहन यावर सविस्तर टीप लिहा.

**उत्तर :** i) आधुनिक संदेशवहन हे तंत्रज्ञानावर आधारीत आहे.

ii) आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगात संगणक भ्रमणध्वनी इंटरनेट कृत्रिम उपग्रह इत्यादी इलेक्ट्रॉनिक माध्यमांच्या आधारे संदेशवहन केले जाते.

iii) आधुनिक संदेशवहन हे तुलनात्मक कमी खर्चीक व जास्त परिणामकारक असते.

iv) हे ई मेल सोशल नेटवर्किंग ब्रॉडकास्टिंग चॅट्स टेलिव्हिजन ब्रॉडकास्टिंग इत्यादी जलद संवाद साधने प्रदान करते.

v) आधुनिक संदेशवहन एका विशिष्ट क्षेत्रापुरते मर्यादित न राहता आपण जगभर संवाद साधू शकतो.

Genius
JEE | NEET | CET | FOUNDATION Institute